# "झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दर्जा : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड शहर)"

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

### मानव्य विद्याशाखा अंतर्गत 'समाजशास्त्र' या विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा


*** संशोधिका ***

**मर्लिका दिगांबर हरदडकर**

सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

*** मार्गदर्शक ***

**प्रा.डॉ.दिपक सुधाकरराव धारवाडकर**

समाजशास्त्र विभागप्रमुख,
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सेनगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली.

*** संशोधन केंद्र ***

सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.


**मार्च २०२२**

# "झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दर्जा : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड शहर)"

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजात कायद्याच्या दृष्टिकोनातून स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत. समाजाला प्रगतीच्या दिशेने न्यायचे असेल तर, दोघांचाही समप्रमाणात विकास होणे आवश्यक आहे. परंतु, समाज व्यवस्थेत स्त्रीला आजही दुय्यम स्थान दिले जात आहे. स्त्री व पुरुष दोघांच्याही जैविक क्षमता सारख्याच असून, अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, रूढी-परंपरांच्या माध्यमातून तिला चार भिंतीच्या आत डांबून ठेवून तिला परावलंबी केले आहे. पुरुषापेक्षा कनिष्ठच आहे असे तिच्या मनावर बिंबवून तिच्यात न्यूनगंड निर्माण करण्यात आला आहे. स्त्री अनेक मानवी अधिकारांपासून आजही वंचित राहिली आहे. स्त्रियांमध्ये पुरुषांप्रमाणेच सर्व क्षमता असताना 'चूल आणि मूल' यापलिकडे तिला जाऊ दिले नाही. 'चूल आणि मूल' या कौटुंबिक कार्यात गुंतवून ठेवण्यात पुरुषी संस्कृती यशस्वी झाली. परिणामी स्त्रियांच्या सर्वच अधिकार आणि निर्णय क्षमतेवर, कार्यक्षमतेवर बंधने घालण्यात आली आहेत. परंतु, प्राचीन काळापासून ते आजतागायत कर्तबगार स्त्रियांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करून आपल्या कार्याचा आलेख समाजाला दाखवून दिला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या दर्जाचे मूल्यमापन करण्याची समाजाची मानसिकता बदलली आहे. कालांतराने प्रत्येक समाजातील स्त्रियांचा दर्जा देखील बदलत आहे. परंतु झोपडपट्टी संस्कृतीमधील स्त्रीची परिस्थिती वेगळीच आहे. झोपडपट्टीमधील स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि तिचे मूल्यमापनाचे माप हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. झोपडपट्टीमधील महिलांचे जीवन आणि महिलांचा दर्जा जाणून घेण्याचा प्रयत्न आपण येथे करणार आहोत.

ब्रिटिशांच्या काळात भारतातील स्त्रियांच्या समस्या प्रथम दृष्टिपथात आल्या. ब्रिटिशांनी स्त्रियांच्या प्रगतीला प्रारंभ केला. ब्रिटिशांनी भारतातील स्त्रियांवर असलेले विविध निर्बंध कायद्याचा आधार घेऊन दूर केले. विशेषतः सतीची चाल, विधवा विवाह, केशवपन, बालविवाह आदी अमानुष प्रथांचे निर्मूलन केले. तेव्हापासून स्त्रियांचा दर्जाचा हळूहळू उन्नत होत गेला. परिणामी, ब्रिटिशांच्या सुधारणावादी धोरणांचा परिणाम स्त्री जीवनावर झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्य, समतेच्या तत्वावर आधारित राज्यघटना तयार करण्यात आली. घटनेने समाजातील सर्वच स्त्रियांना समानता दिलेली आहे. महिलांच्या स्थिती आणि दर्जात वाढ करणारे काही कायदे अंमलात आले. त्यामुळे भारतात लोकशाही प्रक्रियेत महिलांना समान संधी देण्याची मागणी पुढे आली.

जागतिक स्तरावर स्त्रियांच्या दर्जाच्या संदर्भात विविध परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. १९७५ मध्ये युनोच्या पुढाकाराने मेक्सिकोमध्ये जागतिक पातळीवर महिला परिषद झाली. परिषदेत महिला प्रश्नांवर व्यापक चर्चा केली. पुढे १९८० मध्ये कोपनहेगनला दुसरी जागतिक महिला परिषद झाली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने १९७५ ते १९८५ हे दशक 'महिला दशक' म्हणून सर्व जगभर साजरे करण्यात आले. १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे नौरोबी येथे तिसरी आंतरराष्ट्रीय महिला परिषद भरविण्यात आली. नौरोबीच्या परिषदेतपासून संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत असा विचार मांडला की, जागतिक महिला परिषदेमध्ये प्रत्येक देशातील शासनाने आपल्या देशातील स्त्रियांच्या व त्यांच्या विकासाचा अहवाल सादर करावा. तसेच परिषदेत स्त्रियांच्या स्थितीचा आणि एकूण विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आणि शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार १९९४ मध्ये बिजिंग येथे ४ थी 'जागतिक महिला परिषद' झाली. सदर परिषदेत भारत सरकारने महिलांच्या स्थितीचा अहवाल सादर केला. यातूनच महिलांचा दर्जा विकासाला वेग आला आणि राष्ट्राच्या विकासात महिलांचे स्थान महत्त्वाचे असे सांगितले. महिलांना पुरुषांप्रमाणेच समान अधिकार, समान राजकीय सहभाग असावा याबाबतचा मुद्दा सर्वत्र चर्चेमध्ये आहे. फक्त चर्चा केली जाते, प्रत्यक्षात झोपडपट्टीमधील महिलांना संधी

मात्र फार कमी प्रमाणात मिळते. झोपडपट्टीमधील महिलांचा विकास करावयाचा असेल तर स्त्रियांचा सहभाग प्रत्येक क्षेत्रात असायला हवा. हे चित्र जेव्हा प्रत्यक्षात साकार होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने झोपडपट्टीमधील महिलांच्या दर्जात परिवर्तन होत आहे असे म्हणता येईल.

**विविध कालखंडातील स्त्रियांचा दर्जा :**

विविध कालखंडामध्ये भारतीय स्त्रियांचा दर्जा बदलला आहे. प्राचीन काळापासून ते आजातागायत भारतीय स्त्रियांच्या दर्जामध्ये आपणास बदल दिसून येतो. ते विविध कालखंड याप्रमाणे आहेत. प्राचीन कालखंडातील स्त्रियांचा दर्जा : प्राचीन कालखंडामध्ये मातृसत्ताक कालखंड महत्त्वाचा समजला जातो. मातृसत्ताक कालखंडामध्ये स्त्रियांचा दर्जा समाधानकारक होता. त्याचप्रमाणे वैदिक कालखंडातील स्त्रियांच्या दर्जावर देखील प्रकाश टाकण्यात येणार आहे तसेच उत्तरवैदिक कालखंडातील स्त्रियांचा दर्जा तपासण्यात येणार आहे. मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांच्या दर्जाचे मूल्यमापन देखील करण्यात येणर आहे. ब्रिटिश कालखंडातील स्त्रियांचा दर्जा प्रगतीच्या मार्गावर होता याचे देखील विवेचन करण्यात येणार आहे तसेच स्वातंत्र्योत्तर काळापासून ते वर्तमान स्थितीतील सर्वच समाजातील दर्जाचे विवेचन करून विशेषतः झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांच्या दर्जावर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

**स्त्रियांचा दर्जा :**

भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा महत्त्वाचा समजला जातो. भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांचा दर्जा पुरुषांप्रमाणे दाखविला आहे. म्हणजेच स्त्री-पुरुष समान आहेत असे अधोरेखित केले आहे. वास्तव परिस्थितीचा स्वीकार केला जात नाही. प्रत्यक्ष सामाजिक परिस्थितमधील स्त्रियांचा दर्जा समजून घेणे आवश्यक आहे. सामाजिक स्थान म्हणजे व्यक्तीचे समुहातील स्थान होय. व्यक्तीच्या अनेक आवश्यक गरजा असतात. त्या गरजांची पूर्तता करण्यासाठी तो समूहाचा सदस्य बनतो. प्रत्येक समूहात व्यक्तीचे स्थान हे त्या काळातील प्राप्त झालेले अधिकार आणि कार्यावरून ठरते. एखादी महिला आणि कुटुंबात कुटुंबप्रमुख, ऑफिसमध्ये अधिकारी तर एखाद्या सामाजिक संघटनेचा सचिव इत्यादी विविध स्थाने भूषवित असते. प्रत्येक सामाजिक स्थानाशी संबंधित दर्जा आणि भूमिका ठरलेल्या असतात. समाजामध्ये व्यक्तीचे जे स्थान असते त्या स्थानावरून त्या व्यक्तीकडून विशिष्ट वर्तनाची अपेक्षा करतो.

**दर्जा म्हणजे काय? :**

'दर्जा म्हणजे एखाद्या विशिष्ट समाजव्यवस्थेत विशिष्ट काळी एखाद्या विशिष्ट व्यक्तीला असलेले स्थान होय.' अशी व्याख्या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ.रॉल्फ लिंटन यांनी केलेली आहे. या संदर्भात ऑगबर्न आणि निमकॉम यांची व्याख्या प्रसिद्ध आहे. त्यांच्यामते, "समुहाने व्यक्तीच्या भूमिकेला किंवा भूमिका संचाला म्हणजेच समाजात व्यक्तीचे असलेले स्थान म्हणजेच त्या व्यक्तीचा दर्जा होय. वरील सर्व व्याख्यांवरून स्पष्ट होते की, व्यक्तीचे समुहातील स्थान म्हणजे दर्जा होय. म्हणजेच व्यक्ती ज्या समूहाची सभासद असते त्या समुहात व्यक्तीचे कोणाशी कोणत्या पद्धतीने वागावे, तिचे वर्तन कसे असावे यासाठी समाजाने त्या व्यक्तीला बहाल केलेले अधिकार, हक्क म्हणजेच दर्जा होय." व्यक्तीचे लिंग, वय, वैवाहिक स्थिती, गुणवत्ता, व्यवसाय, आर्थिक परिस्थिती इत्यादी गोष्टीच्या योगाने त्या व्यक्तीचे समाजातील स्थान ठरते.

**संशोधन पद्धती :**

वर्तमान समाज व्यवस्थेत नवीन ज्ञानात भर टाकण्यासाठी सातत्याने संशोधन केले जाते. सर्व सामाजिक शास्त्रांचा विकास हा संशोधनामुळेच होत आहे. विशेषतः समाजशास्त्रात नवीन सिद्धांत निर्मिती करण्यासाठी संशोधन केले जात आहे. सद्यःस्थितीत समाजशास्त्रीय संशोधनात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केल्या जात आहे. 'Research' याला मराठीत संशोधन असे म्हणतात. 'To

Research' म्हणजे शोधून काढणे आणि 'Re-search' पुन:पुन्हा शोधणे होय. म्हणजेच सामाजिक वास्तवतेचा किंवा सामाजिक सत्याचा पुन:पुन्हा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. वेबस्टरच्या शब्दकोशात असे म्हटले आहे की, "संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य भाग आहे. संशोधन एक प्रवाह आहे. तो कधीच थांबत नाही. वर्तमान ज्ञानात नवीन ज्ञानाची भर टाकणे हे संशोधनाचे कार्य आहे. तथ्य वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण तथा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत पद्धतशीरपणे केलेले परिक्षण होय." बोगार्डस् यांच्या मते, "सामाजिक जीवन जगणाऱ्या लोकांच्या जीवनाचे सखोल अध्ययन करून त्यातील क्रीयाशील अंतर्भूत प्रक्रियांना शोधून काढणे म्हणजे सामाजिक संशोधन होय."

**संशोधन विषयाची निवड :**

समाजातील स्त्रियांच्या जीवनात २१ वे शतक महत्त्वाचे ठरले अहे. २१ व्या शतकात आधनिकीकरण, जागतिकीकरा, माहिती तंत्रज्ञान, उत्तर आधुनिकता, सांस्कृतिकीकरण, पाश्चिमात्तीकरण, यामुळे समाजातील पितृसत्ताक कुटुंबात बदल झाला आहे. संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंबे उदयास आली. त्याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रियांना बंधनात ठेवणाऱ्या पुरुषी परंपराचा त्यांनी स्वीकार करणे बंद केले. त्याचप्रमाणे स्त्री विकासाला व प्रगतीला अडथळा निर्माण करणाऱ्या प्रथा, बालविवाह, विधवा पुन:र्विवाह, केशवपन आणि सांस्कृतिक निर्बंध काळाच्या प्रवाहात बंद झाले. तसेच समाज सुधारक यांनीदेखील प्रयत्न केले तरीपण स्त्रियांना पुरुषांबरोबरचे अधिकार मिळाले नाहीत. स्त्री पुरुष समान आहेत हे तत्त्व फक्त कागदांवरच दिसून येते. वास्तविक परिस्थिती विपरीत आहे. झोपडपट्टीमधील स्त्रियांचा विचार केला तर, परिस्थिती खूप गंभीर आहे. झोपडपट्टीमधील स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन दुय्यम आहे. विकासाचे आणि प्रगतीचे मापदंड झोपडपट्टीमधील स्त्रियांसाठी भिन्न भिन्न आहेत. आजही झोपडपट्टीमधील स्त्रियांचा दर्जा दुय्यमच आहे. झोपडपट्टीमधील स्त्रियांचा दर्जा दुय्यम असण्याची कारणे कोणती आहेत? झोपडपट्टीमधील स्त्रियांचा दर्जा का सुधारला नाही? झोपडपट्टीमधील स्त्रिया दर्जा उन्नत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत काय? इत्यादी कारणांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून शोध घेण्यासाठी सदरील संशोधन विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे.

२. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांचा आर्थिक दर्जाचा अभ्यास करणे.

३. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांच्या शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करणे.

४. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांच्या राजकीय दर्जाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :**

१. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय स्त्रियांचा सामाजिक दुय्यम आहे.

२. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय स्त्रियांचा आर्थिक दर्जा अत्यंत खालावलेला आहे.

३. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय माहिलांची शैक्षणिक स्थिती अत्यंत दयनीय आहे.

४. झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलांचे राजकीय क्षेत्रात योगदान अत्यंत अल्प आहे.

**संशोधनाचे क्षेत्र :**

सामाजिक घटना आणि समस्यांचा अभ्यास करताना सामुग्रीची निवड करणे अनिवार्य असते. कारण संशोधनाचा विषय विस्तीर्ण क्षेत्रात पसरला जाऊ शकतो. परंतु त्या सर्व क्षेत्रातून माहिती संकलित करणे संशोधन करणे अशक्य नसते. अशावेळी संशोधकाला आपले अध्ययनाचे क्षेत्र देखील निश्चित करावे लागते. संशोधन कार्य क्षेत्राची निवड योग्य पद्धतीने केले तरच ते कार्य पुढे जाऊ शकते. अन्यथा अनेक अडचणी उत्पन्न होतात. त्यामुळे अध्ययन क्षेत्राची निवड करणे आवश्यक असते. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील नांदेड शहराची निवड केली आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

१. प्रस्तुत अध्ययन हे मराठवाड्यातील व प्रगत नांदेड शहरापूरते मर्यादित आहे. सदरील शहरातील मागासवर्गीय स्त्रियांचा दर्जा अभ्यासण्यात येणार आहे.

२. संशोधनात मागासवर्गीय स्त्रियांचा दर्जा उंचावणाऱ्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. ही संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

३. या संशोधनात फक्त मागासवर्गीय स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास केला जाणार आहे ही एक संशोधनाची मर्यादा सांगण्यात येईल.

**संशोधनाचा आराखडा :**

समाजशास्त्र संशोधनात आराखड्याची महत्त्वाची भूमिका आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय "झोपडपट्टीमधील मागासवर्गीय महिलाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दर्जा : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड शहर)" हा आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे. वर्णनात्मक आराखड्याचा मुख्य उद्देश हा संकलित तथ्यांच्याद्वारे अध्ययन विषयाचे अथवा समस्यांचे वर्णनात्मक विश्लेषण करणे आहे.

**नमूना निवड :**

सदरील विषयाचे अध्ययन करण्यासाठी नमूना निवडीची भूमिका महत्त्वाची आहे. त्याकरिता गैरसभांव्यता नमूना निवडीतील सहेतूक अथवा उद्देशपूर्ण नमूना निवड प्रकाराचा उपयोग करण्यात आला. यामध्ये संशोधक आपल्या विषयाच्या उद्देशांना समोर ठेऊन जाणीवपूर्वक अध्ययन क्षेत्रातील एककांची निवड करतो. यामध्ये नांदेड शहरातील झोपडपट्टीमधील महिलांची निवड करण्यासाठी सहेतूक नमूना निवड पद्धती उपयोगी ठरली आहे. एकूण २२० मागासवर्गीय महिलांची निवड केलेली आहे. सदरील महिलांकडून मुलाखत अनुसूचीचा वापर करून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय अध्ययन करण्यात येणार आहे.

**तथ्य संकलन :**

विषयाचे अध्ययन करण्यासाठी तथ्य संकलनाची आवश्यकता असते. तथ्य संकलित करून नवीन सिद्धांताचे प्रतिपादन करता येते. तथ्य संकलन हा संशोधन कार्याचा आत्मा आहे. तथ्य संकलन करण्याच्या प्रमुख दोन पद्धती आहे. प्राथमिक तथ्य संकलन आणि दुय्यम संकलन पद्धती, या दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्यात येणार आहे.

**अ) प्राथमिक स्रोत :**

संशोधक स्वत: अध्ययन क्षेत्रात जाऊन विषयाच्या संदर्भात जीवंत व्यक्तीकडून मुलाखत अनुसूचीचा अवलंब करून माहिती संकलित करतो. त्यास प्राथमिक तथ्य संकलन असे म्हणतात. प्राथमिक तथ्य संशोधकर्ती स्वतः संकलित करणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी मागासवर्गीय २२० महिलांची निवड करण्यात आली आहे. २२० मागासवर्गीय महिलांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय परिस्थिती जाणून घेण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे.

**ब) दुय्यम स्रोत :**

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचा महत्त्वपूर्ण मार्ग दुय्यम स्रोत आहे. यामध्ये प्रकाशित आणि अप्रकाशित अशा संपूर्ण लिखित माहितीचा समावेश होतो. दुय्यम स्रोतामधून मिळालेली माहिती, आकडेवारी संशोधनाला वस्तूनिष्ठ बनवण्यासाठी उपयोगाची ठरते. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात प्राथमिक व सुक्ष्म स्वरूपाची माहिती दुय्यम स्रोतांद्वारे मिळत असल्याने त्या विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार करता येते. संशोधक प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करीत नसून विषयाशी संबंधित माहिती ग्रंथालय, संदर्भग्रंथ, सांख्यिकीय माहिती, अहवाल, आंतरराष्ट्रीय अहवाल याद्वारे संकलित करतो, अशा माहितीचा समावेश दुय्यम स्रोतात होतो.

**प्रकरणांची रूपरेषा :**

१. प्रकरण पहिले : प्रस्तावना

२. प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

३. पकरण तिसरे : संशोधन पद्धती

४. प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन

५. प्रकरण पाचवे : संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी

**संदर्भग्रंथसूची :-**


१. खंडागळे चंद्रकांत, (जुलै १९८८), "भारतीय समाज", प्रकाशक मायादेवी खंडागळे, गणेशनगर, सांगली.

२. मेहेत्रे स्मीता, (जुलै २०११), "भारतीय स्त्री आणि मानवाधिकार", साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. पवार दीपक, (मार्च २०१३) "महिलांचे राजकीय सक्षमीकरण", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. बोर्डे सुनिता, खडसे संतोष, (२०१०), "ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया", शुभम प्रकाशन, पुणे

५. लांजेवार ज्योती, (२०१५), "भारतीय समाज आणि स्त्री", सुगावा प्रकाशन, पुणे.

६. अनंतराम शरयू, वडसे उमा (अनु.), (१९९८), "भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

७. कऱ्हाडे बी.एम., (जून २००९) "सामाजिक संशोधन पद्धती", पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

८. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, (२०१३), "सामाजिक संशोधन पद्धती", साईनाथ प्रकाशन, नागपूर.

९. पाटील वा.भा. (१९९८), "संशोधन पद्धती", मंगेश प्रकाशन, नागपूर

१०. आगलावे प्रदीप, (जानेवारी २०००), "संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर.

११. देसाई संभाजी (मार्च २०१४), "महिला सबलीकरण", प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथम आवृत्ती.

१२. आढाव विलास (मार्च २०१०), "महिला सबलीकरण", प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

१३. वडेहरा किराण, कोरेथ जॉर्ज (२००५), "ग्रामीण महिला सशक्तीकरण", सेज पब्लिकेशन्स, दिल्ली.

१४. जडिया सीता (२०१२), "दलित महिला विकास योजना एवं बालिका शिक्षा", ओमेगा पब्लिकेशन्स, दिल्ली.

१५. माहेश्वरी अविनाश (२०११), "महिला अधिकार और कानून", प्रिज्म बुक्स (इण्डिया), जयपूर, प्रथम संस्करण.

१६. श्रीवास्तव सुधाराणी (२०१०), "महिलाओं के प्रती अपराध", कॉमनवेल्थ पब्लिशर्स, दिल्ली.

१७. श्रीवास्तव सुधाराणी, श्रीवास्तव आशा (२०११), "महिला शोषण और मानवाधिकार", अर्जून पब्लिशर्सींग हाऊस, दिल्ली.

18. Devasia Leelamma (1997), “Empowering Women”, Ashish Publishing House, New Delhi.

19. Maithereyi Krishnaraj (1981), “Women and Development”, Analytical Press Pectives not conf. on women Studies, Mumbai.

20. Omvedt Gail, (1993), “The Women’s Movement in Reinventing Revolution”, M.E.Sharp, New York.

21. Ranjan Annita, (2006), “MGNREGA and Women Empowerment”, Prashant Publication, Jalgaon.

22. www.vikipedia.com

23. www.vikaspedia.com

24. https://vishwakosh.marathi.gov.in

25. https://www.bookganga.com.in

26. www.mswc.com



संशोधिका
**मर्लिका दिगांबर हरदडकर**
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.दिपक सुधाकरराव धारवाडकर**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सेनगाव,
ता.सेनगाव, जि.हिंगोली.